MHLA050000602019

## नियमीत दिवाणी दावा क्र.०७/२०१९ मधील नि. क्रं.७१ वरील आदेश

प्रतिवादी क्र.५ ने हा अर्ज देवून निशाणी क्र.६९ वर म्हणणे देण्याची संधी देण्याची मागणी केली आहे.

२. वादीच्या वकीलांनी या अर्जावर म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केलेला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.५ च्या वकीलांचे म्हणणे असे की वादीने दिनांक २४.१.२०२२ रोजी निशाणी क्र.६९ अर्ज देवून त्यासोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत. ती कागदपत्रे खोटी आहेत. परंतु त्यावर प्रतिवादी क्र.५ चे म्हणणे न घेता कागदपत्रे दाखल करण्यास वादीला परवानगी दिलेली आहे. प्रतिवादी क्र.५ चे म्हणणे त्या अर्जावर घेणे आवश्यक होते.

४. वादीच्या वकीलांचा युक्तिवाद असा की, पक्षकारांमध्ये तडजोड करण्याबाबत ज्या हलचाली झाल्या त्यासंदर्भात कागदपत्रे वादीने दाखल केले आहेत. त्यामुळे प्रतिवादींना कसलीही हानी नाही.

५. या दाव्यात अद्यापही वादीचा उलटतपास सुरू झालेला नाही. वादी व प्रतिवादी दरम्यान तडजोडीचे बोलणे सुरू होते याबाबत दोन्ही पक्षांना हरकत नाही. वादीने निशाणी क्र.६९ या अर्जासोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत. वादीने कागदपत्रे दाखल केली याचा अर्थ ती सिध्द झालेली आहेत असा होत नाही. कागदपत्रे दाखल करून घेतली असली तरी त्या कागदाचे पुरावामुल्य वादीस सिध्द करणे आवश्यक आहे. कोणत्याही पक्षकारास

कागदपत्र दाखल करण्यापासून वंचित करता येणार नाही. त्यामुळे वादीस कागदपत्रे दाखल करण्याची संधी दिलेली होती. त्यामुळे प्रतिवादीने दाखल केलेला हा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

अर्ज नामंजूर केला आहे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2022.02.18 16:01:45 +0530

**(प्र. अ. सवदीकर)**

दि.१८/०२/२०२२.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.